सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन १९५५ चा मुंबई विनियम क्रमांक १

# मुंबई वीज (विशेष अधिकार) अधिनियम (अनुसूचित क्षेत्रांना लागू करणे) विनियम, १९५५

(दिनांक ४ फेब्रुवारी २००६ पर्यंत सुधारलेला)

# Bombay Regulation No. I of 1955

# The Bombay Electricity (Special Power) Act (Application to Scheduled Areas ) Regulation, 1955

*(As modified upto the 4th February 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री
महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

2006

( किंमत : रु. २.०० )

# मुंबई वीज (विशेष अधिकार) अधिनियम (अनुसूचित क्षेत्रांना लागू करणे) विनियम, १९५५

---

## अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. ... ... ... ... | १ |
| २. | विवक्षित अनुसूचित क्षेत्रांना सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० लागू करणे. ... | १ |


(शा.म.मु.) एच ४२७७ (३,०६७—४-२००६)

## सन १९५५ चा मुंबई विनियम क्रमांक १

**[ महाराष्ट्र वीज (विशेष अधिकार) अधिनियम (अनुसूचित क्षेत्रांना लागू करणे) विनियम, १९५५. ]**

[ २८ एप्रिल, १९५५ ]

**मुंबई राज्यातील विवक्षित अनुसूचित क्षेत्रांना मुंबई वीज (विशेष अधिकार) अधिनियम, १९४६ लागू करण्यासाठी विनियम.**

सन १९४६ चा २०. **ज्याअर्थी,** मुंबई राज्यामध्ये, अनुसूचीतील क्षेत्रांच्या शांततेसाठी व सुशासनासाठी मुंबई राज्यातील विवक्षित अनुसूचित क्षेत्रांना मुंबई वीज (विशेष अधिकार) अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा मुंबई २०) यांच्या तरतुदी लागू करणे आवश्यक आहे ;

**त्याअर्थी,** आता, मुंबईचे राज्यपाल भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीतील परिच्छेद ५ चा उप परिच्छेद (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, राष्ट्रपतींच्या अनुमतीने याद्वारे, पुढीलप्रमाणे विनियम करीत आहेत :—

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.** १. (१) या विनियमास, मुंबई वीज (विशेष अधिकार) अधिनियम (अनुसूचित क्षेत्रांना लागू करणे) विनियमं, १९५५, असे म्हणावे.

(२) तो यापुढे जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्रांना लागू असेल.

(३) तो, ताबडतोब अंमलात येईल.

**विवक्षित अनुसूचित क्षेत्रांना सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० लागू करणे.** २. मुंबई वीज (विशेष अधिकार) अधिनियम, १९४६ हा, यात यापुढे जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्रांना लागू होईल.

### अनुसूची

(कलम २ पहा)

(१) पश्चिम खानदेश जिल्ह्यातील नवापूर पेठा व अक्राणी महल.

(२) पूर्व खानदेश जिल्ह्यातील सातपुडा टेकड्यांचे आरक्षित वन क्षेत्र.

(३) नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुका व पेंट पेठा.

(४) ठाणे जिल्ह्यातील डहाणू व शहापूर तालुके व मोखाडा व उंबरगाव पेठा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई